*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT /Vol. XII / Issue – I* *ISSN 2277-8063*

# महात्मा गांधी : जगाविषयीचा विशाल दृष्टीकोन

**प्रा.डॉ.चंदना अनिल लोखंडे**, श्री.संपतराव माने महाविद्यालय, खानापूर जि.सांगली.

........................................................................................................................................

जीवन हेच वास्तव आहे, आहे ते उत्कट.
आणि थडगे नव्हे जीवनप्रवासाचा शेवट.
तू माती असशी आणि मातीत परतशी
हे सांगितलेलं नाही, आत्म्याबद्दल कुणीही.[१]
—हेन्री वॅड्‌संवर्ध लॉंगफेलो.

वरील काव्याच्या पंक्ती 'अ सम ऑफ लाइफ' या पुस्तकातील हेन्री लॉंगफेलो यांनी लिहिल्या आहेत. आजचा प्रत्येक माणूस ताण—तणावाने ग्रस्त असल्याचे दिसून येतो. काहीतरी ओझ्याखाली, दबावाखाली वावरताना दिसतो. परंतु जीवन थडगे न मानता; ते उत्कट आणि उदात्तपणे जगता आले पाहिजे. 'जगणे' कितीही समस्याग्रस्त असले तरी, प्रत्येक समस्येतून मार्ग काढता येतो.

आजच्या आधुनिक युगात संघर्ष सोडवण्याचे जे भयानक व निरर्थक मार्ग वापरले जातात, त्यावरून आधुनिक संस्कृती कशी धोकादायक वळणावर आहे, हे लक्षात येते. अशावेळी गांधीजींच्या विचारांची गरज भासत आहे. त्यांनी 'अहिंसा आणि शांतीचा' मार्ग केवळ सांगितलाच नाही तर प्रत्यक्ष कृतीद्वारा करून दाखवला.

'शरीर जसे क्षणभंगुर आहे, शरीरिक शक्तीही क्षणभंगुर आहे; परंतु विचारांची शक्ती मात्र कायम टिकणारी आहे, कारण विचार अविनाशी आहेत. प्रा.योहान गॅल्टंग

**गांधीजींची दूरदृष्टी:—**

मानवाने केवळ शरीरावरच प्रेम करू नये तर प्रगल्भ विचारांवर, आचरणांवरही करावे असे उदात्त विचार सांगताना गांधीजी म्हणतात; 'अहिंसा हा आपला धर्म आहे, तर हिंसा हा पशूंचा कायदा आहे. पशूमध्ये आत्मा निद्रितावस्थेत असतो आणि त्यांना केवळ शरीरिक सामर्थ्याचा कायदाच कळतो. मानवजातीने एका वरिष्ठ कायद्याचे म्हणजे आत्म्याच्या नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे... प्रेमाच्या कायद्याचे माणसावर अधिपत्य आहे. जर द्वेष आणि दंगलीचा नियम लागू झाला असता, तर मानवजात केव्हाच नामशेष झाली असती. गांधीजींच्या जीवनात चढऊतार, गती, उत्कंठा नि नाट्य आहे. अलौकिक सद्‌गुणांचा अविष्कार आहे. परिस्थितीशी, समाजातील व्यवस्थेशी, नि अंतरंगातील प्रवृत्तींशी झालेला झगडा आहे. भव्य—दिव्याचा मांगल्याचा नि माणूसकीचा थरार आहे. चिकाटी ही त्यांची निसर्गदत्त देणगी ठरली होती. 'सुसंस्कृत समाजातच सत्याग्रह होऊ शकतो, हे जेवढे खरे आहे, तेवढेच सत्याग्रह समाजाची सांस्कृतिक पातळी उंचावतो, हे खरे आहे. [२]आणि म्हणूनच युरोपमधील त्यापूर्वीच्या अयशस्वी ठरावाबद्दल बोलताना वॉलेसा म्हणाले होते. "शस्त्रे घेऊन लढण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही; पण अहिंसेचा मार्ग स्वीकारल्यावर आम्ही

जिंकलो. मी महात्मा गांधींचा अनुयायी आहे. (गांधीजींचे असामान्य नेतृत्त्व — पास्कल ॲलन नाझरेथ, अनुवाद : सुजाता गोडबोले, पृ.क्र.१३२)(३)

आजचा प्रत्येक माणूस भौतिक सुखाच्या मागे हापापल्यासारखा धावतो आहे, 'पैसा आणि पैसा' हेच एकमेव जगण्याचे साधन मानून त्यासाठी कोणत्याही वाममार्गाचा अवलंब करताना दिसतो. माणूस पशूपेक्षाही क्रूर विचार आणि आचरण करताना दिसतो आहे. कोणत्याही मार्गाने मिळवलेली संपत्ती 'परमेश्वराची देणगी' समजू लागला आहे पण समाधान त्याला कुठेच मिळताना दिसत नाही. अशावेळी जे.आर.डी. टाटा यांचे उदाहरण नजरेसमोर प्रकर्षाने येते; ते म्हणतात, "गांधीजींची विश्वस्त ही मुलभूत संकल्पना मला पहिल्यापासूनच मान्य होती, असे म्हणणे उचित ठरलेल आणि माझ्या कारकिर्दीत मी त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर आमच्या उद्योगसमूहाने शक्यतो हा आमच्या ध्येयाचा भाग मानण्याचा प्रयत्न केला आहे. मला फक्त या कल्पनेचा प्रत्यक्षात कसा परिणाम होईल. याबाबतच शंका वाटते; कारण एका बाजूला आपल्या देशातील आजच्या व्यापारी वर्गातील नैतिकता किंवा तिचा अभाव आणि दुसऱ्या बाजूला समाजवादाचा तात्त्विक दृष्टीकोन आणि त्यामधून आपल्या सरकारने अंगीकारलेला खाजगी उद्योगांबाबत वैरभाव"[४]

काही विशिष्ट मर्यादेपर्यंत शरिरीक सुख गरजेचे असते, पण ते अति झाल्यास त्याची अडचण होते. म्हणून अमर्याद निर्माण करणे आणि त्यांची पूर्ती करणे हा एक भ्रम आणि सापळा आहे. दैनंदिन गरजांची वाढ झाली की, "साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी" या आदर्शापासून माणूस खाली खेचला जातो. खरा आनंदा हा समाधानच असतो. यामुळे महात्मा गांधीजींचा जीवनविषयीचा आणि जगण्याविषयीचा दृष्टीकोनाचा पुनर्विचार करावा लागेल.

'आपल्या निश्चयाप्रती दृढ असणारा आणि आपल्या कार्यावर नितांत श्रद्धा असणारा एखादा लहानसा गटही नवा इतिहास घ्डवू शकतो—' असे आत्मविश्वासाने महात्मा गांधी सांगतात. कोणत्याही धर्मातील, समाजातील, देशातील व कोणत्याही स्तरावरील प्रत्येक स्त्री—पुरूषांसाठी गांधीजींचे विचार प्रेरणादायीच ठरतील. ते म्हणतात, "काही थोड्या लोकांनी हाती सत्ता घेतल्याने नव्हे, तर सत्तेचा दुरूपयोग होत असताना त्याला विरोध करण्याची ताकद जेव्हा सर्वांच्यात येईल, तेव्हाच खरे स्वातंत्र्य मिळेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर सर्वसामान्य लोकांना सत्तेवर ताबा कसा ठेवायचा व तिचे योग्य नियोजन कसे करायचे याचे शिक्षण देण्यानेच खरे स्वातंत्र्य मिळवावे लागेल."[५] याचाच अर्थ अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. द्वेषाने किंवा शस्त्राने कोणताच हेतू साध्य होत नाही; तर अहिंसेच्या मार्गाने संयमी आणि क्षमाशील वृत्तीने माणूस खजील होऊन सकारात्मक विचार करायला लागतो असे उदात्त विचार महात्मा गांधींनी प्रत्यक्ष आचरणातून शिकवण्याचा प्रयत्न केला.

**सुरक्षेसाठी विचार:—**

सुरक्षा आणि शांतता मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान विशद करताना, सत्य, न्याय, अहिंसेचे प्रशिक्षण आणि परस्परांच्या संमतीने केलेल्या करारांची अंमलबजावणी हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक आहेत. शस्त्रास्त्रांचा मोठा साठा, देशांवर हल्ला करून ते काबीज करणे व युद्ध पुकारणे हा योग्य मार्ग नव्हे, असा गांधीजींचा याबाबतचा दृष्टीकोन होता.

नितीमत्ता किंवा नैतिकता मानवी मनाच्या विचारधारेवर आधारीत आहे. म्हणूनच गांधीजी पुढे म्हणतात; 'युद्धे ही मानवी मनात सुरू होतात म्हणून शांततेचे रक्षण करण्याची सुरूवात देखील माणसांच्या मनातच निर्माण व्हायला हवी.'[६]

स्वतंत्र भारताने देशाच्या रक्षणासाठी गांधीजींच्या अहिंसेच्या धोरणाचा अजिबात स्वीकार केला नसता, तरी देशातील व परदेशांतील अनेक संरक्षणविषयक विश्लेषकांनी त्यांच्या फायद्याच्या बाजूनं विचार केलेला दिसतो.

**निष्कर्ष :—**

१. आधुनिक युगातही गांधीजींचे विचार तंतोतंत योग्य ठरतात.
२. भ्रष्टाचार, द्वेषाचा त्याग करून सत्य, न्याय अहिंसेच्या मार्गाने प्रश्न सुटतात.
३. नैतिक मूल्यांची जोपासना ही आजची खरी गरज आहे.
४. साधी रहाणी उच्च विचारसरणी हे तत्त्व अंगीकारणे काळाची गरज आहे.
५. देश, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय एकात्मतेसाठी महात्मा गांधीजींचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

संदर्भ ग्रंथ सूची —

१. गांधीजींचे असामान्य नेतृत्त्व
— पास्कल ॲलन नाझरेथ
— अनुवाद: सुजाता गोडबोले
— राजहंस प्रकाशन प्रा.लि., आवृत्ती: पहिली
मे २०१४; पृ.क्र. १३२

२. तत्रैव — पृ.क्र.१६०

३. तत्रैव — पृ.क्र.१३८

४. 'लेट्स किल गांधी!
— तुषार अ.गांधी
अनुवाद: अजित ठाकूर
मेहता पब्लिशिंग हाऊस — पुणे
प्रथमावृत्ती ऑक्टोबर २०१०

५. गांधीजी मान नि महामानव
—द.ना.गोखले
मौज प्रकाशन गृह ४३४ — प्रथमावृत्ती १९९६.